# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/२०१८/९६७ अ
दिनांक : 31 JUL 2018

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहणा-या जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात सूचना

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी , पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे केंद्रीभूत प्रवेश फे-या संपन्न होत आहेत. शासनमान्य प्रवेश नियम तसेच , पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०४ दिनांक २४.४.२०१७ मधील प्रवेश नियमावलीमधील मुद्दा क्रमांक १३ व दिनांक ५.६.२०१८ रोजीच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक २०२ अन्वये निर्गमित सुधारीत प्रवेश नियमावलीमधील मुद्दा क्रमांक ९ नुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठीची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यानुसार विना अनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य. यांनी प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. संदर रिक्त जागा भरणेबाबत संस्थेने प्रवेशाबाबतचे वेळापत्रकासोबत **केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतर शिल्लक राहिलेल्या जागांची संख्या त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.**

राज्यातील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांवर संस्थास्तरीय कोटयातील जागा. अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठी वरील तरतूदी बंधनकारक असून त्यानुसार प्रवेश करण्यात यावेत.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 2605
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 2 AUG 2018

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांनां कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात दिलेल्या सुचनेनुसार शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थास्तरीय, अल्पसंख्याक कोटयातील जागा व केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहणाऱ्या जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर